नि.दिवाणी दावा क्र०५/२०१८
दशरथ वि. शासन
प्र.वादी क्रं. ४ तर्फे सा.क्र.१(नि.क्र.१०२)

वादीतर्फे उलटतपास श्री.व्ही.ए.सोनकांबळे यांच्यामार्फत सुरु.

**१७.** मी याकामात प्रतिवादी क्रं. ४ आहे. हे खरे की, वादी आणि माझी चांगली ओळख आहे. प्रतिवादी क्रं. ५ शी माझे नाते नाही. तो माझा समाजबांधव आहे. वादीने गट क्रं. १५६ वर हा दावा दाखल केला. त्या गटाची जमीन साडेसात एकर आहे. त्यात माझी एक एकर चार गुंठे जमीन आहे. सदर १५६ गट हा मौजे वडारवाडी येथील आहे. हे खरे की, एकत्रकरणापूर्वी ही जमीन उजना गावाच्या हद्दीत होती. उजना आणि वडारवाडी या गावांमध्ये ४ ते ५ कि.मी.अंतर आहे. हे खरे की, माझी एक एकर चार गुंठे जमीन मुळची उजना गावाच्या काठाची आहे. उजना गावात ही जमीन असताना तिचा क्रं १५३ होता.

**( वकीलांच्या प्रकृती अस्वस्थामुळे उलटतपास तहकूब. )**

**श्रवणोत्तर स्विकृत**

समक्ष
स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**
**दिनांक ०४/१०/२०२५.** **दिवाणी न्यायाधीश व.स्तर, अहमदपूर.**